‘सीटबेल्ट’बाबत संभ्रम!

कारवाईचे नियम स्पष्ट करण्याची मागणी; टॅक्सीचालकांचा विरोध कायम

अभिषेक तेली-दिशा काते, लोकसत्ता

मुंबई : चारचाकी वाहनांतील मागच्या आसनावर बसलेल्या प्रवाशांनाही सुरक्षापट्टा (सीटबेल्ट) लावणे बंधनकारक करणाऱ्या नियमाची अंमलबजावणी मुंबई पोलिसांनी मंगळवारपासून सुरू केली. मात्र, पुढील दहा दिवस थेट कारवाई न करता प्रवाशांना समज देण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला आहे. दुसरीकडे, कारवाईबाबतच्या नियमांमध्ये पुरेशी स्पष्टता नसल्याचे मत व्यक्त होत आहे. मुंबईतील टॅक्सीचालकांनीही या नियमांना विरोध कायम ठेवला आहे.

केंद्रीय मोटार वाहन नियम १२५ (१) अन्वये आठ प्रवासी क्षमतेपर्यंत आसन व्यवस्था असलेल्या चारचाकी वाहनातील सर्व प्रवाशांना सीटबेल्ट वापरणे बंधनकारक आहे. तसेच मोटार वाहन (सुधारित) कायदा २०१९ कलम १९४ (ब) (१) अन्वये वाहन चालक व प्रवास करणारे सर्व सहप्रवासी यांनी सीटबेल्टचा वापर न केल्यास वाहनचालकांवर ई-चलान कारवाई करण्याबाबत आदेश काढण्यात आले आहेत. याची अंमलबजावणी एक नोव्हेंबरपासून करण्याचे पोलिसांनी जाहीर केले होते. मात्र, मंगळवारी पहिल्या दिवशी पोलिसांनी कारवाईऐवजी समजावणीचा सूर लावला. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना सध्या समज देण्यात येणार असून ११ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

पोलिसांनी कारवाईचे नियोजन केले असले तरी, मुंबईकरांना अजूनही या नियमांचे गांभीर्य आणि माहिती नसल्याचे पहिल्या दिवशी दिसले. अनेक वाहनांमध्ये मागील आसनावर बसलेल्या प्रवाशांनी सीटबेल्ट लावले नसल्याचे ‘लोकसत्ता’ प्रतिनिधींच्या ढोबळ पाहणीत दिसून आले. या नियमांबाबत पुरेशी स्पष्टता नसल्याचे मत अनेक वाहनचालक तसेच प्रवाशांनी व्यक्त केले आहे. शहरांतर्गत प्रवासासाठी गरजच काय? मागच्या आसनांवर दोनच पट्टे असतील तर तिसऱ्या माणसाने काय करायचे? असे प्रश्न प्रवाशांनी उपस्थित केले आहेत.

पहिल्या दिवशी वाहतूक पोलिसांनी सौम्यपणे प्रवाशांना नियमांची कल्पना दिली.

पोलिसांना इशारा

सीटबेल्ट व हेल्मेट वापराबाबतच्या नियमांचे कठोर पालन करण्याच्या सूचना मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेने सर्व पोलिसांना दिल्या आहेत. तसेच या सूचनांचे पालन न करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. सहपोलीस आयुक्त (वाहतूक) राजवर्धन सिन्हा यांनी सर्व पोलीस विभागांना याबाबतचे एक पत्रक पाठवले आहे. कायद्यासमोर सगळे समान या तत्त्वानुसार सर्वप्रथम पोलिसांनी कायद्याचे कठोर पालन करणे अपेक्षित आहे. तरी कर्तव्यावरील पोलीस अधिकारी व अंमलदार वाहतूक नियमांचा भंग करताना आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पत्राद्वारे देण्यात आला आहे.

> **काळाच्या ओघात रस्ते चांगले झाल्यामुळे वाहनांची गती वाढली आहे, परिणामी अपघात होण्याचे प्रमाण वाढले. त्यामुळे सहप्रवाशांनीसुद्धा सीटबेल्ट लावणे गरजेचे आहे. सध्या आम्ही सरसकट कारवाई न करता या नियमाबाबत जनजागृती करत आहोत. - संजय देशमुख,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मरिन ड्राइव्ह वाहतूक विभाग

टॅक्सीचालकांचा विरोध

सीटबेल्ट लावण्याबाबत टॅक्सी चालकांमध्ये नाराजी आहे. ‘वाहनचालक नियमितपणे सीटबेल्ट लावतात आणि पुढे डाव्या बाजूस बसणारे प्रवासी हे विनंती केल्यानंतरच सीटबेल्ट लावतात. त्यामुळे आता मागच्या बाजूस बसणाऱ्या प्रवाशांना सीटबेल्ट लावणे बंधनकारक केल्यानंतर सरकारने कितीही आवाहन केले तरीसुद्धा या नियमाचे काटेकोरपणे पालन होण्याची शक्यता कमी आहे,’ असे मुंबईत गेल्या ४५ वर्षांपासून टॅक्सी चालविणारे बाबू कासीम शेख यांनी सांगितले. सीटबेल्टचा नियम टॅक्सींसाठी नसावा, अशी अपेक्षा राम लखन साहू यांनी व्यक्त केली. मागच्या प्रवाशाने सीटबेल्ट लावला नसल्यास याची कारवाई चालकावर करणार की प्रवाशांवर असा प्रश्नही टॅक्सीचालक विचारत आहेत.

ताडगोळे बाजारात दाखल

लोकसत्ता प्रतिनिधी

उरण : पाऊस लांबल्याने ऑक्टोबर हीट उशिरा सुरू झाली असून आठवडाभरापासून कडक ऊन पडण्यास सुरुवात झाली आहे. उन्हाळ्याचा सामना करण्यासाठी आता उरणच्या बाजारात ताडगोळे दाखल झाले आहेत. त्याची किंमत दहा रुपयांना एक नग म्हणजे १२० रुपये डझन आहे. ताडगोळे महाग असले तरी त्याला मागणी असून आवक वाढल्यानंतर किंमत कमी होण्याची शक्यता आहे.

सप्टेंबर व ऑक्टोबरमध्ये पडणारे ऊन ऑक्टोबरनंतरही दिवसभर उन्हामुळे नागरिकांच्या अंगाची काहिली वाढू लागली आहे. नैसर्गिक पाण्याने भरलेले हे फळ चवीलाही गोड असून त्यामुळे शरीराला गारवा मिळतो. ताडाच्या झाडावर येणारे ताडगोळे तयार झाल्याने त्याची विक्री बाजारात सुरू झाली आहे.

ताडगोळ्याचा मोसम उशिरा सुरू झाल्याने व ताडाच्या उंच झाडावर चढणाऱ्यांची संख्या ही कमी असल्याने ती उतरविण्याचा खर्च वाढला आहे. त्यामुळे या वर्षी आगमनालाच ताडगोळ्याच्या किमती वाढल्या असल्याची माहिती उरणमधील ताडगोळे विक्रेत्या सीताबाई यांनी दिली आहे.

अल्पवयीन मुलावर पोलिसांकडून अंत्यविधी

मुंबई: बालगृहात हत्या झालेल्या अल्पवयीन मुलावर अखेर मुंबई पोलिसांनी सोमवारी अंत्यसंस्कार केले. गेल्या दोन महिन्यांपासून शिवाजी पार्क पोलीस या मुलाच्या नातेवाईकांचा शोध घेत होते. त्यासाठी दिल्ली, उत्तर प्रदेशासह विविध ठिकाणी जाऊन पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांचा शोध घेतला होता.

पोलिसांना हसवान निशाद हा मुलगा गिरगाव चौपाटीवर ६ ऑगस्ट रोजी सापडला होता. त्याला ऑगस्टमध्ये माटुंगा येथील बालगृहात ठेवण्यात आले होते. हा मुलगा मानसिकदृष्ट्या अस्थिर असून नीट संवाद साधू शकत नव्हता. चार अल्पवयीन मुलांसह सहा जणांनी त्याची बालगृहात हत्या केली होती. त्यानंतर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. निशाद जिवंत असताना त्याने केवळ तीन शब्दांत पत्ता सांगितला होता. त्यात पारस शाळा, बस्तीपाडा, स्टार चौक या शब्दांचा समावेश होता. त्याच्या पालकांची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांचा माग काढण्यासाठी पोलीस त्या दिशेने काम करत होते. त्यासाठी दिल्ली व उत्तर प्रदेशात पथके गेली होती. पण त्याच्या कुटुंबीयांचा थांगपत्ता लागला नाही. अखेर सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सहाय्यक पोलीस आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची परवानगी घेण्यात आली.

पीकविमा हप्ता वाढल्याने शेतकरी त्रस्त

कोकणातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रतिझाड देण्यात येणाऱ्या दरात तफावत

लोकसत्ता प्रतिनिधी

उरण : आंबा बागायतदार शेतकऱ्यांना शासनाने आंबा पिकासाठी इतर जिल्ह्यांच्या तुलनेत विमा हप्त्यात वाढ केल्याने उरणमधील शेतकरी अडचणीत आले असून विमा हप्ता कमी करण्याची मागणी करूनही शासन पातळीवर अनास्था असल्याने शेतकऱ्यांवर विम्याविनाच आंबा शेती करण्याची वेळ आली आहे.

शासनाने पुनर्रचित हवामानावर आधारित, फळपीक विमा योजना सुरू केलेली आहे. यासाठी रायगड जिल्ह्याकरिता ॲग्रीकल्चर इन्शुरन्स विमा कंपनी, मुंबई या कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. याअंतर्गत नैसर्गिक आपत्ती व हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण मिळते.

दरम्यान, केंद्र व राज्य शासनाचा सहभाग असलेली आंबा पिकासाठी फळपीक विमा योजना लागू करण्यात आली असताना, सम हवामान असलेल्या कोकणातच ही विषमता दिसून येते. यात शासनाने जे निकष लावले आहेत, त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी एका झाडासाठी १३३ रुपये, रत्नागिरी जिल्ह्यासाठी एका झाडासाठी १६७ रुपये, ठाणे जिल्ह्यासाठी एका झाडासाठी २३४ रुपये आणि रायगड जिल्ह्यासाठी एका झाडासाठी २९४ रुपये अशी तफावत यामध्ये दिसून येत आहे.

२०१९-२०२०-२०२१ सालापर्यंत रायगड जिल्ह्यासाठी एका झाडासाठी प्रीमियम रुपये ७० होता. म्हणजे हेक्टरी रुपये ७ हजार रुपये होता. २०२१-२२ सालापासून, तो एकदम चार पट वाढविण्यात आला. म्हणजे एका झाडाला रुपये २९४ तर हेक्टरी रुपये २९ हजार ४०० रुपये करण्यात आला आहे.

पूर्वी कोकणासाठी एकच दर होता. कारण रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यांचे हवामान जवळपास सारखेच आहे. मागील वर्षापासून रायगड जिल्ह्यासाठी चारपट प्रीमियम हा अवास्तव असल्यामुळे तो कमी व्हावा, यासाठी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्याकडे मागील वर्षी शेतकऱ्यांनी पाठपुरावा केला असल्याची माहिती, चिरनेरचे कृषिमित्र प्रफुल्ल खारपाटील, सरपंच संतोष चिर्लेकर, आंबा बागायतदार भास्कर ठाकूर, कृष्णा केणी यांनी दिली. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी आयुक्त कृषी पुणे यांना तो कमी करण्याबाबत लेखी निवेदन दिले होते.

या अनुषंगाने कृषी आयुक्त, पुणे यांच्याबरोबर शेतकऱ्यांची बैठक झाली. मात्र प्रीमियम कमी करण्यात यश आले नाही, तर तत्कालीन कृषिमंत्री दादाजी भुसे यांना कृषिमित्र प्रफुल्ल खारपाटील व अन्य शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष भेटून, लेखी निवेदनाद्वारे अनेकदा पाठपुरावा केला. मात्र विमा हप्ता कमी झाला नाही. त्यामुळे उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी विमा उतरविण्यात अडचण निर्माण झाली आहे.

Classifieds

जागासंबंधी

दिवाळी गोल्ड ऑफर! दापोलीतील सेमीफर्निश्ड बंगलो २५ लाखांपासून तसेच दगडी कंपाऊंड, रोड, पाणी, लाईट, सीसीटीव्ही, वायफाय इ. सुविधांसह १४ लाखांपासून एनए प्लॉट्ससुद्धा उपलब्ध. स्वतंत्र ७/१२, बँकलोन. ९५९५०१५०००. www.greatkonkan.com
0090311841-2

यात्रा विशेष

हॉटेल रिसॉर्टस्

अलिबागमधील पर्यटनाविषयी योग्य मार्गदर्शन, प्रशस्त कैवल्य फार्ममध्ये राहण्याची उत्तम व्यवस्था व्हेज नॉनव्हेज जेवणासह! एकदा राहून तर पहा!! जोशी 9653231807, 8850642600.
0090310732-1

visit us at WWW.LOKSATTA.COM

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातींतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

E-AUCTION SALE NOTICE FOR SALE OF MOVABLE AND IMMOVABLE PROPERTIES

E-Auction Sale Notice for Sale under the Insolvency and Bankruptcy Code, 2016 (See Reg 32 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulations, 2016) together with sale of immovable assets under the Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 read with proviso to Rule 8(6) of the Security Interest (Enforcement) Rules, 2002.

BETON CONCRETE PRODUCTS PRIVATE LIMITED
(herein mentioned as "borrower "and "corporate debtor" also)
(CIN: U65990MH1984PTC031901)
Reg, office: PASAYADAN, 412, N-3, CIDCO, AURANGABAD MH 431003 IN
Liquidator: Anagha Anasingaraju
Address: 1-2, Aishwarya Sankul, G A Kulkarni Path, Opp. Joshi Railway Museum, Kothrud, Pune 411038.
Email ID: rp.anagha@kanjcs.com

E-Auction Notice is hereby given to the public in general and in particular to the Borrower(s) and to the Guarantor(s) for Sale of assets of Beton Concrete Products Pvt Ltd (in Liquidation), forming part of the liquidation estate formed by the liquidator, under the Insolvency and Bankruptcy Code, 2016 (See Reg 32 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulations, 2016) jointly with portions of the land of the guarantors of the corporate debtor mortgaged with the secured creditor forming integral part of the plant under SARFAESI Act, 2002 (see rule 6 proviso to rule 8(6) of the Security Interest (Enforcement) Rules, 2002) on "as is where is", " as is what is" and "whatever where is" basis.

Date and Time of Joint E-Auction: Tuesday, 20 December 2022 from 03:00PM to 05:00PM IST (with unlimited extension of 5 min each)

Short Description of the Immovable Property along with Land details:

Sr. No.	Particulars	Total Reserve Price	EMD Amount	Remarks
1.	Sale of assets of Beton Concrete Products Pvt. Ltd. (in Liquidation) Building and Shed owned by the Corporate Debtor situated at Gut No: 223/1/2 C (Old) New Gut No: 223/1/2/F Revenue Village: Khadka, Taluka: Newasa, District: Ahmednagar (Land not owned by the Corporate Debtor) under the provisions of Insolvency and bankruptcy Code, 2016 and regulations framed thereunder.	3,50,00,000/-	35,00,000/-	The assets of Beton Concrete Products Pvt. Ltd. (In Liquidation) are being sold jointly with the parcels of land owned by the promoters of Beton Concrete Products Pvt. Ltd. (in Liquidation) in the name of Shri. Ramesh Amrutlal Pokerna which are integral part of the plan t of the corporate debtor in order to maximize the value of sale of the assets.
2.	**All the part and parcel of the land, as detailed below, mortgaged to Janata Sahakari Bank Ltd.,** for recovery of Rs 6,95,93,914.32 (Rupees Six Crore Ninety-Five Lakhs Ninety-Three Thousand Nine Hundred and Fourteen and Thirty-Two Paise Only) + Accrued Interest and Charges thereafter due to the following Secured/ Financial Creditor as on 30.09.2021 plus interest and cost thereafter: Property owned by Mr. Pokerna Ramesh Amrutlal- Land Situated at: Gut No. 223/1/2 C (Old) New Gut No: 223/1/2/F Revenue Village: Khadka, Taluka: Newasa, District: Ahmednagar - admeasuring 1H48R (3.67 Acre) Along with entire adjoining land at: Gut No. 223/1/2 A (Old) New Gut No: 223/1/2/D Revenue Village: Khadka, Taluka: Newasa, District: Ahmednagar admeasuring 0H80R (2 Acre) And land situated at: Gut No. 223/1/2 B (Old) New Gut No: 223/1/2/E Revenue Village: Khadka, Taluka: Newasa, District: Ahmednagar admeasuring 0H80R (2 Acre)			

Please note that a single auction will be undertaken for all the properties for a combined reserve price of Rs. 3,50,00,000/- (Rupees Three Crores Fifty Lakhs Only) The sale will be concluded under respective Acts for the relevant Assets. For detailed terms and condition of this E-auction combined sale, refer https://e-auction.123done.in/. For any query regarding E-auction, contact: Mr. Shekhar Singh at +91- 9711522275 / 7428993244; shekhar.singh@123done.in bh1@123done.in. Detailed terms and conditions of auction sale under SARFAESI is available at https://e-auction.123done.in/

Bidders shall make independent enquiries prior to submitting their bid and submit bids online in the prescribed format available on website https://e-auction.123done.in/ Please Contact: Mr. Shekhar Singh at +91-9711522275 / 7428993244; shekhar.singh@123done.in bh1@123done.in

Interested bidders will have to upload their KYC documents along with the EMD submission details on https://e-auction.123done.in/ before 05:00PM of 19 December 2022.

The name of the eligible bidders will be identified by the Liquidator to participate in e-auction on the portal https://e-auction.123done.in/ The e-auction service provider (www.123done.in) will provide User id and password by email to eligible bidders.

E-auction date & Time: **Tuesday, 20 December 2022, 03:00PM to 05:00PM** (with unlimited extension of 5 min).

The bidding will start from the reserve price, in case, a bid is placed in the last 5 minutes of the closing time of the e-auction, the closing time will automatically get extended for 5 minutes with unlimited extension. If in any given case bidder fails to bid due to any reason apart from technical issues from Auction portal EMD amount submitted by bidder shall be forfeited.

The bidder who submits the highest bid amount on closure of e-Auction process shall be declared as the Successful Bidder and a communication to that effect will be issued through electronic mode which shall be subject to approval by the Liquidator. The highest bid does not entitle the bidder to claim as a successful bidder. The liquidator's decision in this case would be final.

Upon the communication by the Liquidator to the successful bidder through e-mail / any other electronic mode, the successful bidder shall be required to further deposit 10% of the bid amount within 2 working days and balance sale consideration be paid within 30 days of the e-auction. Failure to deposit such amount shall result in the forfeiture of amount deposited as initial EMD and the bidder with the 2nd highest bid in value shall be declared as the successful bidder thereafter. The process shall continue until the payment of further deposit by the bidder. The initial EMDs paid by the remaining bidders shall be refunded within a period of 15 days from the date of e-auction.

The Successful Bidder shall bear the applicable stamp duties/transfer charge, fees etc. and all the local taxes, duties, rates, assessment charges, fees etc. in respect of the property put on auction.

Date: 2-11-2022
Place : Pune

Authorized Officer
Janata Sahakari Bank Ltd.

Anagha Anasingaraju
Liquidator

MANAPPURAM HOME FINANCE LTD.

मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड
पूर्वीची मनप्पुरम होम फायनान्स प्रा. लि.
सीआयएन : यू६५९२३के१२०१०पीआयसी०३९१७९, युनिट नं. ३०१ ते ३१५, ३ रा मजला, ए विंग, कनकिया वॉल स्ट्रीट, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००९३.

डिमांड नोटीस

याद्वारे सूचना देण्यात येते की, पुढील कर्जदारांनी कंपनीकडून प्राप्त केलेल्या कर्ज सुविधेच्या मुद्दलाची परतफेड व व्याजाचे प्रदान करण्यात कसूर केली आहे आणि कर्जाचे वर्गीकरण नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए) असे करण्यात आले आहे. त्यांनी कंपनीकडे दिलेल्या त्यांच्या अखेरच्या ज्ञात पत्त्यांवर त्यांना सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट-२००२ च्या कलम १३(२) नुसार सूचना जारी करण्यात आल्या होत्या, त्याच्या भरीला खाली नमूद केलेल्या उक्त कर्जदारांच्या माहितीकरिता उक्त कर्जदारांना या जाहीर सूचनेच्या स्वरूपात कळविण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे/सह-कर्जदाराचे नाव/ एलएएन/ शाखा	ज्याबाबत हितसंबंध निर्माण करण्यात आला आहे अशा प्रतिभूत मत्तेचे वर्णन	एनपीए तारीख	पाठविलेल्या सूचनेची तारीख व अदत्त रक्कम
१.	विष्णूदास देवीदास इघरे, छाया विष्णू इघरे, भानुदास बाजीराव बुधवंत/ सीओ९०सीओएलओएनएस००००००५००४०२१/ औरंगाबाद	प्लॉट नं. ३२, गट क्र. ६५, आदर्शनगर, औरंगाबाद मोटर कंपनीजवळ, चित्तेगाव, पैठण, औरंगाबाद, महाराष्ट्र, पिन-४३११०५	१०.१०.२०२२	**१५.१०.२०२२ आणि ६०६०५६/-**
२.	द्रोपतोबाई गणेश येवले, गजानन गणेश येवले, गणेश रघुनाथ येवले/ एमए१०एमएचएलओएनएस००००००५००७६९५/ नांदेड	एच. नं. २६२, मुक्काम येवले पिंपळगाव, पोस्ट सोनखेड, ता. लोहा, जिल्हा- नांदेड, महाराष्ट्र, पिन-४३१७०८.	१७.१०.२०२२	**२०.१०.२०२२ आणि २४९४३४/-**

वरील कर्जदारांना सूचना देण्यात येते की, कलम १३(२) अंतर्गत सूचनेच्या निर्गमनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीत अदत्त देण्यांचे प्रदान द्यावे, जसे न झाल्यास उपरोल्लेखित दिनांकित, कलम १३(२) अंतर्गत सूचनेच्या निर्गमनाच्या तारखेपासून ६० दिवस संपल्यानंतर सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या उपबंधांनुसार पुढील पावले उचलण्यात येतील.

दिनांक : ०३.११.२०२२
स्थळ : औरंगाबाद

स्वाक्षरी/ - प्राधिकृत अधिकारी
मनप्पुरम होम फायनान्स लि.

pnb Housing Finance Limited

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२, क. जा. मार्ग, नवी दिल्ली-११० ००१. फोन : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com
शाखा पत्ता : इ-१, इ-२ व इ-३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेन्टर, अदालत रोड, औरंगाबाद-४३१ ००१, महाराष्ट्र, ई-मेल : aurangabad@pnbhousing.com

तारखनुसार सुधारित सुरक्षा हित (अमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ३(१) यासह वाचलेल्या वित्तीय मत्तेचा सुरक्षितता व पुनर्रचनेच्या चॅप्टर IIIच्या कलम १३(२) आणि सुरक्षा हित कायदा २००२च्या अंमलबजावणीअंतर्गत सूचना

आम्ही, **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (यापुढे 'पीएनबीएचएफएल' म्हणून संदर्भित) वित्तीय मत्तेचा सुरक्षितता व पुनर्रचनेच्या चॅप्टर III या कलम १३(२) आणि सुरक्षा हित कायदा २००२च्या अंमलबजावणी(यापुढे ''कायदा'' म्हणून संदर्भित) अंतर्गत आमच्या औरंगाबाद शाखेच्या कार्यालयाद्वारा, येथे स्थित- ई-१, ई-२ व ई-३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेन्टर, अदालत रोड, औरंगाबाद-४३१ ००१, महाराष्ट्र, यांच्याद्वारा मागणी सूचना निर्गमित केली होती.** उक्त मागणी सूचना हप्ते/ व्याजाचे प्रदान न केल्यामुळे भारतीय रिझर्व्ह बँक/ नॅशनल हाऊसिंग बँकेच्या मार्गदर्शक सूत्रांनुसार तुमच्या खात्याचे नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स म्हणून वर्गीकरण केल्यामुळे तुम्हास याखाली नमूद केलेले सर्व ऋणको/ सह-ऋणको/ हमीदारांकरिता आमच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा निर्गमित करण्यात आली होती. त्यातील समाविष्ट मजकुरात मुद्दल रकमेचा हप्ता, व्याज इ.च्या प्रदानांमध्ये तुमच्याद्वारा झालेली कसूर दाखविण्यात आली आहे. थकीत रक्कम याखाली नमूद करण्यात आली आहे. याअधिक, काही कारणास्तव, आम्हास विश्वास वाटतो की, तुम्ही मागणी सूचना स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहात आणि म्हणून या मागणी सूचनेची प्रसिद्धी जी उक्त कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गतसुद्धा आवश्यक आहे. तुम्हास याद्वारा या मागणी सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीच्या आत 'पीएनबीएचएफएल'ला आतापर्यंतचे व्याज व आकारासह पूर्वोक्त रकमेचे प्रदान करण्यास फर्माविण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास 'पीएनबीएचएफएल' ऋणको व हमीदारांच्या सुरक्षित मत्तेचा ताबा घेऊन एक किंवा अनेक सुरक्षित मत्तेच्या अनुसार, उक्त कायद्याच्या कलम १३(४)च्या कोणत्याही किंवा सर्व तरतुदींतर्गत आवश्यक कारवाई सुरू करील.

सुरक्षा हित कायदा, २००२ची अंमलबजावणी आणि वित्तीय मत्तेची सुरक्षितता व पुनर्रचनेच्या कलम १३च्या पोट-कलम (८)च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधीत आहोत, जेथे त्याअंतर्गत तुम्ही जाहीर किंवा खासगी कराराद्वारा निविदा मागवून, दरपत्रके मागवून, जाहीर लिलावाद्वारा सुरक्षित मत्तेच्या विक्रीकरिता सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपर्यंत केवळ 'पीएनबी एचएफएल'द्वारा निघालेली सर्व किंमत, आकार व खर्चासह एकत्रित थकीत देणींची संपूर्ण रक्कम भरू शकता/ प्रदान करू शकता. कृपया अशीसुद्धा नोंद घ्यावी की, 'पीएनबीएचएफएल'द्वारा निघालेली किंमत, आकार व खर्च यांसह एकत्रित थकीत देणींची संपूर्ण रक्कम जाहीर लिलाव, दरपत्रके मागवून, जाहीर निविदा मागवून किंवा खासगी कराराद्वारा सुरक्षित मत्तेच्या विक्रीकरिता सूचनेच्या प्रसिद्धीपूर्वी रक्कम न भरली गेल्यास, तुम्ही त्यानंतर सुरक्षित मत्तेचे विमोचन करण्यास हक्कदार असणार नाही. **याअधिक तुम्हास पूर्वोक्त सुरक्षित मत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरणापासून उक्त कायद्याच्या कलम १३(१३) अंतर्गत प्रतिबंध करण्यात आले आहे.**

अ. क्र.	लोन अकाऊन्ट नं.	ऋणको व सह-ऋणकोचे नाव/ पत्ता	हमीदाराचे नाव/ पत्ता	गहाणवट मालमत्ता	मागणी सूचनेची तारीख	मागणी सूचना तारखेनुसार थकीत रक्कम
१.	एचओयू/एआरएनजी/ ०३१९/६५८३१५ शाखा कार्यालय : औरंगाबाद	श्री. मंगेश नारायणराव बोर्डे व सौ. छायादेवी मंगेश बोर्डे, के ५८/३, एन९, सिडको, औरंगाबाद-४३१ ००१	उपलब्ध नाही	रो हाऊस २, रो हाऊसेस श्री कृष्णा रेसिडेन्सी, गट नं. २२८/पार्ट, प्लॉट नं. १ ते ६, ॲट मौजे सावंगी, कबीर मठ रोडजवळ, औरंगाबाद-४३१ ००८, महाराष्ट्र.	११.१०.२०२२	रु. २३,३८,५११.०१ (रुपये तेवीस लाख अडतीस हजार पाचशे अकरा व पैसा एक फक्त) ११.१०.२०२२ रोजीप्रमाणे

स्थळ : औरंगाबाद, तारीख : ०२.११.२०२२
प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

वसुली अधिकारी-१ यांचे कार्यालय, ऋण वसुली अधिकरण औरंगाबाद
''जीवन सुमन'', एल.आय.सी.बिल्डींग, प्लॉट नं.३, एन-५, सिडको, औरंगाबाद - ४३१ ००३.
फोन : (0240) 2473612,फॅक्स : (0240) 2473613, E-Mail : drtaurangabad-dfs@nic.in

Form No.22 [See Regulation 37(1)]

रिकव्हरी ऑफ डेब्टस् ड्यु टू बँक ॲण्ड फायनान्शीयल इन्स्टीट्युशन ॲक्ट, १९९३ सह वाचल्या जाणाऱ्या आयकर कायदा १९६१ मधील दुसऱ्या परिशिष्टामधील नियम ३८, ५२(२) तहत विक्रीचा जाहीरनामा

आर.पी. नं. : ४५/२०१५ **ई-ऑक्शन द्वारे विक्रीचा जाहीरनामा** नि.क्र.३४-अ दिनांक १२/१०/२०२२

स्टेट बँक ऑफ इंडिया विरूद्ध वाघळे केटरींग सर्व्हिसेस

प्रति,
(सीडी-१) मे.वाघळे केटरींग सर्व्हिसेस, मार्फत प्रोप्रायटर श्री.विशाल काशिनाथ वाघळे
द्वारा संदीप व्हिला, शांतीपुरा, छावणी औरंगाबाद, जि.औरंगाबाद,

ज्याअर्थी, मा. पिठासीन अधिकारी, ऋण वसुली आधिकरण, औरंगाबाद यांनी **OA/१३/२०१४** मध्ये जारी केलेल्या **वसुली प्रमाणपत्र क्र.RC/४५/२०१५** या मधील तूम्हास देय असलेली एकूण रक्कम रूपये **५१,४७,१२८/- (रु.एक्कावन्न लाख सत्तेचाळीस हजार एकशे अट्ठाविस केवळ)** अधिक त्यावरील व्याज व दंड रक्कम **रू.५४,०००/- (रू.चोपन्न हजार केवळ)** असे एकूण रक्कम प्रमाणित धनको बँक यांना देण्यास आपण प्रतिवादी असमर्थ ठरलेले आहात. **आणि ज्याअर्थी,** खालील सही करणार यांनी सदरील प्रमाणपत्राच्या समाधानासाठी प्रमाणित ऋणकोच्या खालील परिशिष्टातील नमूद गहाण/जप्त मालमत्ता विक्रीचे आदेश दिले आहेत. आणि ज्याअर्थी **दिनाक ०३/१०/२०२२** पर्यंतची दंड व व्याजासहीत एकूण देय रक्कम **रू.१,३२,६१,२७५/-.**

कोणतीही पुढे ढकलण्याच्या आदेशाच्या गैरहजेरीत, सूचीत करण्यात येते की, सदरील मिळकत ही **ई-ऑक्शन द्वारे दिनांक ०९/१२/२०२२ रोजी ऑक्शन सेल एजन्सी MSTC E-Commerce (IBAPI) यांची** वेबसाईट यावर **ऑन लाईन इलेक्ट्रॉनिक बिडींग द्वारे** दुपारी ३.०० ते ४.०० दरम्यान स्वयंचलीत वेळवाढ या नियमासह विकण्यात येईल.

संपर्कासाठी प्रमाणपत्रधारक बँकेचे व सेवा पुरवठादार यांचे अधिकृत व्यक्तीचा तपशील :
(१) श्री.गजेंद्र सोनकुसरे, मुख्य प्रबंधक, स्टेट बँक ऑफ इंडिया, तणावग्रस्त मालमत्ता वसुली शाखा, प्लॉट नं.१, टाऊन सेंटर, सिडको, एन-५, औरंगाबाद, संपर्क क्र. ८९९९१६१९२९, ई-मेल : **gajendra.sonkusare@sbi.co.in**

मालमत्तेची प्रत्यक्ष पाहणी दिनांक २३/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजे दरम्यान केली जाऊ शकते.

उपरोक्त नमूद प्रमाणित ऋणको यांची खालील परिशिष्टात नमूद केलेली मालमत्ता विकण्यात येत आहे आणि मालमत्तेच्या संदर्भातील आता पर्यंतच्या ज्ञात देयता व मागण्या ह्या परिशिष्टात प्रत्येक मालमत्तेसमोर नमूद केलेल्या आहेत. **विक्रीस ठेवण्यात** आलेली मालमत्ता ही परिशिष्टात नमूद केलेली आहे. जर माल